महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा. क्र : तंशिविकापु/विवि-४/संकीर्ण/२०२३/ 604 दिनांक : 06 FEB 2023

**परिपत्रक-**

**प्रति,**
संचालक/प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या सर्व संस्था
( पुणे विभाग, पुणे )

**विषय : इन्फोसिस कंपनीच्या स्प्रिंगबोर्ड या ऑनलाईन मंचावर नोंदणी करण्याबाबत.**

संदर्भ- तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचा दिनांक १५.१२.२०२१ रोजीचा ई-मेल संदेश.

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त संस्थांना कळविण्यात येते की, उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि इन्फोसिस कंपनी यांच्यामध्ये " त्रिपक्षीय सामंजस्य करार" ( MOU ) करण्यात आलेला आहे. इन्फोसिस कंपनीच्या स्प्रिंगबोर्ड या ऑनलाईन मंचावर उपलब्ध असलेल्या नि:शुल्क ऑनलाईन कोर्सेसचा फायदा हा राज्यातील सर्व शासकीय/अशासकीय महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक यांना होण्यासाठी संचालनालयाने विभागीय कार्यालय व संस्थास्तरावर नोडल अधिकारी नियुक्त करण्याबाबत कळविले आहे. त्यानुसार या विभागीय कार्यालय स्तरावर श्रीमती एस.एस.पानपाटील (मो.नं. ९९२३२८१०४२) यांना नोडल अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहेत.

या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त संस्थांनी संस्थेत २०२२-२३ साठी नेमणूक केलेल्या नोडल अधिकाऱ्याची व विद्यार्थ्यांची माहिती springboard@gppune.ac.in या ई-मेलवर **तात्काळ** पाठविण्यात यावी, अधिक माहिती संकेतस्थळावर संस्थेच्या लॉगीनमध्ये वेळोवेळी उपलब्ध करून देण्यात येईल.

**( डॉ. द.व्यं.जाधव )**
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे